International Year of Cooperatives 2025

महाराष्ट्र शासन
सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे
कार्यालय नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१
दुरध्वनी क्रमांक- २६१२२८४६/२६१२२८४७ ई-: मेल- vaidhanik8 @gmail.com

जा.क्र.४-सआ/कायदा व वै.का./वा.स.सभा/मु.वा./क.७५/२०२५/२२७ दि.:- २९/०९/२०२५

## -:आदेश:-

**विषय:- राज्यातील अतिवृष्टीच्या परिस्थितीमुळे सहकारी संस्थाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत.**

**संदर्भ:- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(१)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ अन्वये राज्यातील सहकारी संस्थांचे कामकाज चालविण्यासाठी प्रत्येक सहकारी संस्था वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत आपल्या सदस्यांची अधिमंडळाची वार्षिक बैठक बोलावील अशी तरतूद आहे. उक्त तरतुदीनुसार सर्व सहकारी संस्थांनी त्यांच्या वार्षिक सर्वसाधारण बैठका ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत आयोजित करणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, सन २०२५ च्या सप्टेंबर महिन्यामध्ये राज्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांची अपरिमित हानी होवून सर्व व्यवहार ठप्प झाले आहेत. अनेक गावे पुरग्रस्त परिस्थितीमुळे पाण्याखाली गेली असून, परिसरातील जनजीवन सुरळीत होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. या कारणामुळे महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा उपरोक्त कलम ७५ मधील तरतुदीप्रमाणे ३० सप्टेंबर, २०२५ पर्यत आयोजित करणे शक्य होणार नाही. आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(१) च्या प्रथम परंतूकान्वये निबंधकास सांसर्गिक रोग, पूर, अतिवृष्टी, दुष्काळ किंवा भूकंप या सारख्या अपवादात्मक परिस्थितीमध्ये, कलम ७५ (१) मध्ये निर्दिष्ट केलेला कालावधी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतका वाढवता येईल अशी तरतूद आहे. आणि,

वरील सर्व परिस्थितीचा साकल्याने विचार करता, राज्यातील अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाल्याने महाराष्ट्रातील काही सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा उपरोक्त कलम ७५ मधील तरतुदीप्रमाणे ३० सप्टेंबर, २०२५ पर्यत आयोजित करणे शक्य होणार नसल्याने वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यासाठी निर्दिष्ट केलेला वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांचा कालावधी एक महिने वाढविणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

**-: आदेश :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (१) च्या प्रथम परंतूकानुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ अन्वये राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या सन २०२४-२५ या कालावधीच्या वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यासाठी निर्धारीत केलेला कालावधी या आदेशाद्वारे राज्यात दि.३१ ऑक्टोबर २०२५ पर्यत वाढविण्यात येत आहे.

Taware

( दिपक तावरे भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :-

१. मा.प्रधान सचिव (सहकार) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. जिल्हाधिकारी, सर्व
४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, सर्व
८. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व
९. तालुका उप / सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, सर्व